# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)


**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, अभिलेख कक्ष विभाग - (०२४२३-२५८७८२, २५८७८३)

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2. record@sai.org.in,

**मुंबई कार्यालय -** साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कडील सन.२०२०-२१ साठी निरूपयोगी भंगार/सादिल साहीत्याचे विक्रीबाबत ई-निविदा

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**निविदाधारकांसाठी सूचना**

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.
२. निविदाधारकास साहित्य खरेदी करावयाची हमी म्हणून रु.१२,०००/- (अक्षरी रु. बारा हजार) मात्र बयाणा रक्कम व निविदा फी रु.२,४०० (अक्षरी रु. दोन हजार चारशे मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर online भरावी लागेल.
३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.
४. सदर निविदा दि.०३/०३/२०२० रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.१३/०३/२०२० सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.
५. **ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**
६. **निविदेसोबतची खरेदी करावयाच्या साहित्याचे दर भरताना BOQ पाहूनच त्यामध्ये जीएसटी सह सर्व टॅक्सेस,वाराई, हमाली व वाहतूक खर्चासह दर भरावे लागतील याची नोंद घ्यावी.**
७. सदरचे भंगार साहित्य संस्थानचे विविध विभागातुन (उदा. प्रसादालयविभाग, लाडु प्रसाद विभाग, भक्तनिवासस्थाने, बगीचा विभाग, इ.) ठिकाणावरुन स्वखर्चाने उचलावे लागेल.
८. कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्विकारणेचा अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.
९. **सदर ई-निविदेतील साहित्याचे वर्णन BOQ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. ते विचारात घेऊनच ई-निविदा भरावी.**

**(दी म मुगळीकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
**शिर्डी– ४२३ १०९. तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर**

## निविदेच्या शर्ती व अटी

१. **विक्री करावयाचे साहित्याचे वर्णन BOQ मध्ये नमूद करण्यात आलेले आहेत. ते विचारात घेऊनच ई-निविदा भरावी.**

२. निविदाधारकास निविदेसोबत **निविदा फी रक्कम रु.२,४००/- (अक्षरी रुपये- दोन हजार चारशे मात्र) व बयाणा रक्कम रु. १२,०००/- (अक्षरी रुपये- बारा हजार मात्र)** www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर online भरावी लागेल.

३. आधारकार्ड, पॅनकार्ड, रहिवासी दाखला इ. सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

४. साहित्याचे दर भरतांना जीएसटी दराचा बोजाचा विचार करुनच निविदा सादर करावी. निविदाधारकाने सदरचे दर संस्थानचे विविध ठिकाणाहुन माल स्वखर्चाने उचलुन नेणे, वाहतूक वगैरे सर्व खर्चासह सर्व समावेशक नमूद करावेत.

५. मंजूर निविदाधारकास अभिलेख कक्षातील कर्मचा-यांमार्फत भ्रमणध्वनीद्वारे / दुरध्वनीवर कळविणेत आलेनंतरच निरूपयोगी सादील स्वरूपाचे साहित्य, अभिलेख कक्ष विभागाशी कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायं.०४.००) (रविवार खेरीज) संपर्क साधून स्वखर्चाने उचलून / खरेदी करून न्यावयाचे आहे.

६. मंजूर निविदाधारकांस उपलब्ध मालाची पूर्ण किंमत नियमानुसार लेखाशाखेत दु. ४.०० वाजेपर्यंत रोख जमा करून माल आहे त्या ठिकाणाहून स्वखर्चाने उचलून न्यावा लागेल.

७. निविदा मंजूर झालेनंतर शिर्डी येथे येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकांस आदा करावी लागेल.

८. अडचणीचे/गर्दीचे काळात आपणांस मंजूर असलेल्या साहित्यापैकी जे साहित्य वेळोवेळी दुरध्वनीवरून वा तोंडी /लेखी (स्मरण पत्र देवूनही) कळवूनही आपण दोन आठवडयाचे आंत न उचलल्यास आपले मंजूर दरानेच दुसरे कुणी खरेदी करीत असल्यास त्यास विक्री केले जाईल. अथवा अशा **साहित्याची विल्हेवाट लावण्याचे अधिकार संस्थानला असतील व त्यातील नुकसान / फरकाची रक्कम आपणाकडून वसूल करण्यात येईल.** त्याबाबत आपली कुठलीही लेखी वा तोंडी तक्रार ऐकून घेतली जाणार नाही , ग्राहय धरली जाणार नाही.

९. वरील ७ च्या अटीची पूर्तता केलेनंतर संस्थानकडून साहित्य खरेदीचा आदेश दिला जाईल.

१०. मंजुर झालेले साहित्य कळविल्यानंतर १५ दिवसांचे आत खरेदी न केल्यास किंवा काही वस्तु उचलण्यास तोंडी/लेखी अगर दुरध्वनीद्वारे संपर्क करुनही साहित्य न उचलल्यास, १६ व्या दिवसापासुन प्रतिदिनी रु.१००/- प्रमाणे दंड भरावा लागेल, दंडाची रक्कम भरल्यानंतरच माल उचलता येईल. तसेच माल न उललल्यास संबंधितांची अनामत रक्कम जप्त करणेत येऊन त्यांचे नाव संस्थानचे काळया यादीत समाविष्ट करण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

११. मंजुर झालेले साहित्य साफ करुन नेणे असल्यास त्याबाबत पुर्व कल्पना अधिक्षक, अभिलेख कक्ष यांना द्यावी. स्वखर्चाने व्यवस्थित साफ-सफाई करुन वजन करुन पैसे जमा करुन/ठोक नगाप्रमाणे माल ताब्यात घ्यावा लागेल. माल उचलतेवेळी कामगारास काही दुखापत / इजा झाल्यास, त्याचे वैद्यकीय देखभाल व खर्चाची सर्वस्वी जबाबदारी संबधितांची राहील. त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

..३..

१२. निविदा मंजुर झालेनंतर निविदाधारकास संस्थानकडे सुरक्षा अनामत रक्कम म्हणुन प्रत्येकी १२,०००/- रु ठेवावी लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. आर्थिक वर्ष संपल्यानंतर सदरची सुरक्षा अनामत रक्कम परत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१३. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१४. पुर्ण निविदा अथवा त्याचा काही भाग मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अगर सर्व निविदा नाकारण्याचा तसेच अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्याचा अधिकार सर्वस्वी संस्थानने राखुन ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक असणार नाही.

१५. आपणास मंजुर झालेले साहित्य पुढील वर्षीचे कार्यादेश पारित होईपर्यंत आहे त्याच मंजुर दरात खरेदी करावे लागेल.

१६. सदरील निविदा प्रकियेबद्दल काही वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टचे न्यायकक्षेत राहील.

**(दी म मुगळीकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस -----------------------------------------------------------

दुकान ------------------------------------------------------------

निवास ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर -----------------------------------------------------------

फॅक्स नंबर ----------------------------------------------------------

ई – मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ----------------------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक- ----------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे- १. ------------------------------------------------------------

२. ----------------------------------------------------------

६. बॅक खाते माहिती:- १. बॅक खाते नाव:- ----------------------------------------------------------

२. शाखा:- ----------------------------------------------------------

३. खाते नंबर व प्रकार:- ---------------------------------------------------------

४. बॅक IFSC कोड:- ----------------------------------------------------------

दिनांक - / /२०२०
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

**अ) Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१) रहिवासी दाखला :-

उदा.ग्रामपंचायत, नगर पंचायत, नगरपालिका, महानगरपालिका)

२) आधार कार्ड / मतदानकार्ड /इतर फोटो आयडी :-

३) आयकर नोंदणी पॅन कार्ड :-

निविदाधारकाची सही व शिक्का

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी**,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कडील सन.२०२०-२१ साठी निरूपयोगी भंगार/सादिल साहीत्याचे विक्री करणेचे ई-निविदाबाबत..**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत. नियमाप्रमाणे बयाणा रक्कम ऑनलाईन भरलेली आहे.

ज्या साहित्याच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने साहित्य खरेदी करण्याची हमी म्हणून रु.१२,०००/- इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही ऑनलाईन भरणा करु. बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. संस्थान अटी-शर्तीप्रमाणे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व मंजूर दराने निविदा कालावधीत मागणीप्रमाणे साहित्य वेळेवर शिर्डी येथील अभिलेख कक्ष विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक -     /     /२०२०
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव                                        सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे